महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/विवि-५/संकीर्ण/२०२३/ 613 दिनांक : 07 FEB 2023

**परिपत्रक-**

**प्रति,**
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था
( पुणे विभाग, पुणे )

**विषय : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने ७५ महाविद्यालयांमध्ये ७५ कार्यक्रमांचे आयोजन.**

संदर्भ- तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/७५कार्यक्रम/२०२२/४२ दि.३१.०१.२०२३

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की, अमृत महोत्सवाची भावना एकत्रितपणे साजरी करण्यासाठी सर्व महाविद्यालयांच्या नाटय विभाग, सांस्कृतिक विभाग, एनएसएस विभागाचे विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयांमध्ये आझाद हिंदची गाथा नाटकाचा प्रयोग, महाराष्ट्रातील ७५ संस्था/महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी ७५ ठिकाणी, ७५ नाटय प्रयोग दि.०८.०३.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. करिता या संचालनालयाच्या अधिपत्याखालील **महाविद्यालयातील थिएटर ग्रुपमधील/ कॉलेजमधील नाटकात भाग घेणाऱ्या १५ कलाकारांनी या नाटकात सहभागी होण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये विनंती करण्यांत आलेली आहे.**

तरी या विभागाच्या अधिनस्त संस्था/ महाविद्यालयांनी आपल्या संस्थेतील नाटकात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव व संपर्क क्रमांक ई-मेल पत्त्यासह natyamahotsav@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावी.

सोबत- संदर्भिय पत्र.

( डॉ. द.व्यं.जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यासन क्र.१६) यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००,००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल–desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

पत्र क्रमांक : १६/आस्था/७५कार्यक्रम/२०२२/४२ दिनांक : 31 JAN 2023

प्रति,
१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

**विषय : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने ७५ महाविद्यालयांमध्ये ७५ कार्यक्रमांचे आयोजन..**
**संदर्भ : सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सांकासं/५१६, दि.२५.०१.२०२३**

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र पहावे. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

अमृत महोत्सवाची भावना एकत्रितपणे साजरी करण्यासाठी सर्व महाविद्यालयांच्या नाट्य विभाग, सांस्कृतिक विभाग, एनएसएस विभागाचे विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयांमध्ये आझाद हिंदची गाथा नाटकाचा प्रयोग, महाराष्ट्रातील ७५ संस्था/ महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी ७५ ठिकाणी, ७५ नाट्य प्रयोग दि.०८.०३.२०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. करीता या संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयातील थिएटर ग्रुपमधील/ कॉलेजमधील नाटकात भाग घेणाऱ्या १५ कलाकारांनी या नाटकात सहभागी होण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

करीता, सदर बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्था/ महाविद्यालयांना याबाबत माहिती देवून संबंधीत संस्था/ महाविद्यालयांची यादी (संपर्क क्रमांक व मेलसह) natyamahotsav@gmail.com या ईमेलवर पाठविण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाराष्ट्र शासन

ई-मेल: mahaculture@gmail.com/ mahaculture.mu-mh@gov.in
वेबसाईट :www.mahasanskruti.org
दूरध्वनी क्र.022-22842634/70 022-22043550

सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई
जुने सचिवालय, विस्तार भवन,
पहिला मजला म.गांधी मार्ग मुंबई-32

क्र. सांकासं/ ५१६.

दिनांक : 25 JAN 2023

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१

विषय :- भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने ७५ महाविद्यालयांमध्ये ७५ कार्यक्रमांचे आयोजन

संदर्भ :- शा.नि.क्र.संकीर्ण/८२२२/प्र.क्र.५११/सांका.४ दि.२३.१.२०२३

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन निर्णयान्वये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र सैनिक, क्रांतीवीर स्वातंत्र्य चळवळीतील योध्यांची माहिती नवीन पिढीला माहिती व्हावी तसेच त्यांच्यामध्ये देशभावनेची प्रेरणा निर्माण व्हावी, या हेतूने 'आजाद हिंदची गाथा' हा कार्यक्रम राज्यातील ७५ ठिकाणी, ७५ संस्थांमार्फत ७५ कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

अमृत महोत्सवाची भावना एकत्रितपणे साजरी करण्यासाठी, सर्व महाविद्यालयांच्या नाट्य विभाग, सांस्कृतिक विभाग, एनएसएस विभागाचे विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयांमध्ये 'आझाद हिंदची गाथा' नाटकाचा प्रयोग सादर करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील ७५ संस्था/महाविद्यालयांमध्ये "आझाद हिंद ची गाथा" नाटक एकाच वेळी ७५ ठिकाणी, ७५ नाट्य प्रयोग सादर होणार आहे. सदरचा नाटकाचा प्रयोद दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

या नाटकाचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत, पोहोचावा यासाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पाहुण्यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात येईल. आर्टिस्टिक ह्यूम्स या संस्थेचे श्री. दर्शन महाजन (९९३०७३२८२९) हे सर्व महाविद्यालयांच्या संपर्कात राहतील.

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अखत्यारितील महाविद्यालयांतील थिएटर ग्रुपमधील / कॉलेज मधील नाटकात भाग घेणाऱ्या १५ कलाकारांनी या नाटकात सहभागी होण्याबाबत विनंती करण्यात यावी, ही विनंती.

उपरोक्त नाट्यप्रयोगाच्या आयोजनासाठी आपल्या अखत्यारीतील सर्व जिल्ह्यातील महाविद्यालयांना याबाबत माहिती देऊन संबंधीत महाविद्यालयांची यादी (संपर्क क्रमांक व मेल सह) natyamahotsav@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(श्रीराम पांडे)
सहसंचालक, सांस्कृतिक कार्य